# महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय
# वार्षिक अहवाल 2017-18

महाराष्ट्रीय मंडळाचे आद्य संस्थापक कै. कॅ. शिवरामपंत दामले व त्यानंतर मंडळाचे अध्वर्यू माजी सरकार्यवाह कै. रमेश दामले यांच्या पवित्र स्मृतिस अभिवादन करून महाविद्यालयाचा शै. वर्ष 2017-18 चा वार्षिक अहवाल सहर्ष सादर करीत आहे. या महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बी.पी.एड्., एम.पी.एड्., एम.फिल.(शारीरिक शिक्षण)(सुटीतील) व पीएच.डी.(शारीरिक शिक्षण) हे अभ्यासक्रम राबविले जातात. महाविद्यालय एन.सी.टी.ई. मान्यताप्राप्त असून नॅक पुनर्मूल्यांकित आहे.

- **ठळक वैशिष्ट्ये/विशेष कामगिरी**

1) शै. वर्ष २०१७–१८ चा प्रथमसत्र प्रारंभ दि.१० जुलै २०१७
2) सालाबादप्रमाणे बीपीएड् व एमपीएड्.निकालामध्ये विद्यार्थ्यांचे उत्तुंग यश
3) सेट २०१७ :– १८ विद्यार्थी उत्तीर्ण , नेट – २०१६ सुमित तांबे
4) बीपीएड पदवीग्रहण समारंभ (१० मार्च२०१८)
5) अखिल भारतीय आंतरविद्यापीठस्तरावर योगदान. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघांमध्ये प्रतिनिधीत्त्व
6) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतर विभागीय बास्केटबॉल व फूटबॉल स्पर्धांचे आयोजन
7) पुण्यातील ६३ शाळांतील विद्यार्थ्यांसाठी Obsty Race चे महाविद्यालयामध्ये आयोजन (१६ ते १८ नोव्हेंबर २०१७)
8) Sports Carnival दिमाखात संपन्न (१७ मार्च २०१८)
9) आगाशे कबड्डी लीग (६–७ एप्रिल २०१८ ला आयोजित)
10) महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय कार्यशाळेचे (दि.१६ जाने.२०१८) व चर्चासत्राचे आयोजन (२ व ३ फेब्रुवारी २०१८)
11) विद्यापीठाची NSS योजना महाविद्यालयाने प्रथमच राबविली.
12) प्राचार्य डॉ.सोपान कांगणे व डॉ. श्रध्दा नाईक – Resource person : State Level Seminar on “Health and Nutritional Status of Women” (Pravaranagar)
13) डॉ.अमित प्रभू – एलएनआयपीई, ग्वालियर येथे आयोजित न्यूट्रिशन फॉर स्पोर्टस एक्सरसाईज अॅन्ड वेट मॅनेजमेंट राष्ट्रीय कार्यशाळेत ०५ एमपीएड (द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यासह सहभाग– (५–११ फेब्रु २०१८)
14) डॉ. श्रध्दा नाईक – यांनी प्रिमियर लीग ऑक्शन हा ऑनलाईन कोर्स पूर्ण केला
15) एनएसएसच्या ओरिएंटेशन प्रोग्रॅम मध्ये समन्वयक प्रा.कुमार उपाध्याय यांचा सहभाग (कालावधी ६ ते १२ जुलै २०१७) तसेच प्रा. कुमार उपाध्याय यांची भुवनेश्वर ते पुणे – सायकल सफारी (दि.२३ डिसेंबर २०१७ ते ३ जानेवारी.२०१८)
16) महाविद्यालयाच्या आजी व माजी विद्यार्थ्यास २०१७–१८ चे श्रीशिवछत्रपती राज्यक्रीडा पुरस्कार, कृष्णा काळे (मल्लखांब) रणजित चामले (आर्चरी)
17) प्राईड ऑफ आगाशे पारितोषिक – माजी संचालक शारीरिक शिक्षण, गरवारे वाणिज्य महाविद्यालय, प्रा.शैलेश आपटे यांना जाहीर
18) पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी विशेष (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी शारीरिक शिक्षण कार्यक्रम राबविला.
19) वाचन प्रेरणादिन व “Blind date with Open books “ या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन
20) सा.फु.पुणे विद्यापीठ, (गुणवत्ता सुधार कार्यक्रम) अंतर्गत चर्चासत्रासाठी अनुदान प्राप्त
21) परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प

**गतवर्षीय परीक्षा फल : सालाबादप्रमाणे निकालामध्ये नेत्रदीपक यश**

| अभ्यासक्रम | निकाल |
|---|---|
| बीपीएड् (मे २०१७) | ९४.४४ |
| एमपीएड्.(मे २०१७) | १०० |

| अभ्यासक्रम | 2016-17 मधील उत्तीर्ण | 2016-17 पर्यंत उत्तीर्ण |
|---|---|---|
| **एम.फिल (शा.शि.)** | 01 | 93 |
| **पीअेच.डी.** | 01 | 30 |

- **महाविद्यालयात व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्वप्रथम (परीक्षा मे २०१७)**
  **बीपीएड – कु.रेश्मा धुमाळ**
  **एमपीएड –कु. गोम्स केव्हिना**
- **एम.फिल (शा.शि.) पदवी प्राप्त (२०१७–१८)** श्री कदम गणेश भानुदास (O Grade)
- **पीएच.डी.–श्री काळे अमेय विनायक**
- **सेट उत्तीर्ण – १८ विद्यार्थी, नेट २०१६– ०१ (सुमित तांबे)**

➢ **प्रवेश**

- **बी.पी.एड्.** या वर्षावधीत ८० विद्यार्थ्यांनी बी.पी.एड्. अभ्यासक्रम (प्रथमवर्ष) साठी प्रवेश घेतला आहे. बी.पी.एड अभ्यासक्रमाच्या दोन तुकड्या अनुदानित आहेत. बी.पी.एड्. अभ्यासक्रम (द्वितीयवर्ष) साठी ७० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.
- **एम.पी एड.** (प्रथमसत्र) या अभ्यासक्रमास २८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर द्वितीयवर्ष मध्ये १५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
- **एम. फिल्.(शा.शि.)(सुटीतील अभ्यासक्रम)**
  शै. वर्ष 2016-18 मध्ये मार्गदर्शकांकडे जागा नसल्यामुळे एम.फिल (सुटीतील) अभ्यासक्रमाचे प्रवेश झाले नाहीत या वर्षावधीत १ विद्यार्थ्यांने एम. फिल्.(शा.शि.) पदवी प्राप्त केली.
- **पीएच.डी.**
  मे २०१७ मध्ये मार्गदर्शकांकडे जागा नसल्यामुळे अद्याप पीएच.डी चे प्रवेश झाले नाहीत जानेवारी २०१८ मध्ये पीएच.डीसाठी ०६ विद्यार्थ्यांची निवड करण्यांत आली आहे.
- **विद्यार्थ्यांचा ओघ**
  यावर्षी महाराष्ट्र शासनाच्या सीईटी द्वारे बीपीएड (प्रथमवर्ष) अभ्यासक्रमास ८० व एमपीएड (प्रथमवर्ष) अभ्यासक्रमास २८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. यामध्ये गोवा राज्यातील ७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेउन (बी.पी.एड –०८ व एम.पी.एड ०३) महाविद्यालयास पसंती दर्शविली आहे. बीपीएड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमास ६८ व एमपीएड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमास १५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

➢ **क्रीडासहभाग**

महाविद्यालयामध्ये दरवर्षीच विविध क्रीडाबाबींमध्ये आंतरमहाविद्यालयीन, विभागीय व राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंचा सहभाग असतो. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धासामन्यांमध्ये एकूण ७ सांघिक क्रीडाबाबी व ८ वैयक्तिक क्रीडास्पर्धामध्ये आमच्या खेळाडूंचा सहभाग होता.

- **क्रीडास्पर्धा प्राविण्य**
  1) आंतरविद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांचा सहभाग
  2) सलग २२ व्या वर्षी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये पदके प्राप्त.

**आंतरमहाविद्यालयीन आंतरविभागीय व राष्ट्रीय पातळी वरील सहभाग**

| स्तर | मुले | | | | मुली | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | BPEd I yr | BPEd II yr | MPEd I yr | MPEd II yr | BPEd I yr | BPEd II yr | MPEd I yr | MPEd II yr | मुले | मुली |
| आंतरमहाविद्यालयीन | 31 | 48 | 03 | - | 32 | 42 | 4 | - | 82 | 78 |
| विभागीय पातळी | 03 | 04 | 01 | - | 08 | 09 | 01 | - | 08 | 18 |
| आंतरविद्यापीठ व अखिलभारतीय आंतरविद्यापीठ | - | 01 | 01 | - | 05 | 05 | 01 | - | 02 | 11 |

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वैयक्तिक सहभाग – ८ क्रीडाबाबी

| अ.क्र. | क्रीडाप्रकार | मुले | मुली |
|---|---|---|---|
| 1 | कॉर्फबॉल | | वंदना वानखेडे बीपीएड् (प्रथमवर्ष) |
| 2 | हॅन्डबॉल | | |
| 3 | फूटबॉल | | पवार ऐश्वर्या बीपीएड् (प्रथमवर्ष)<br>रोविता फर्नांडिस एमपीएड् (प्रथमवर्ष) |
| 4 | बास्केटबॉल | | काळे शिवाली बीपीएड् (प्रथमवर्ष) |
| 5 | बेसबॉल | | काळे स्नेहल बीपीएड् (द्वितीयवर्ष) |
| 6 | कुस्ती | | गोंडिल गौरी बीपीएड् (प्रथमवर्ष)<br>काळे अश्विनी बीपीएड् (द्वितीयवर्ष)<br>भांडारकर पल्लवी बीपीएड् (द्वितीयवर्ष) |
| 7 | ज्युदो | | निकम अनिता बीपीएड् (द्वितीयवर्ष) |
| 8 | मल्लखांब | काळे कृष्णा बीपीएड् (द्वितीयवर्ष) | -------- |
| 9 | नेटबॉल | जगदीश चेडे बीपीएड् (द्वितीयवर्ष) | मोजाड वैशाली बीपीएड् (द्वितीयवर्ष) |

**महाविद्यालयाचे सांघिक बाबीं मधील यश– ७ क्रीडाबाबी**

द्वितीय क्रमांक – ०१ , तृतीय क्रमांक – ०५

| अ.क्र. | क्रीडाबाबीचे नांव | आंतरमहाविद्यालयीन स्तर | |
|---|---|---|---|
| | | मुले | मुली |
| 1 | ॲथलेटिक्स | सहभाग | सहभाग |
| 2 | हॅन्डबॉल | – | तृतीय क्रमांक |
| 3 | फुटबॉल | सहभाग | तृतीय क्रमांक |
| 4 | कबड्डी | तृतीय क्रमांक | |
| 5 | हॉकी | तृतीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
| 6 | बेसबॉल | सहभाग | –– |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | नेटबॉल | द्वितीय क्रमांक | – |

**खुल्या क्रीडास्पर्धा मध्ये आमच्या खेळाडूंचा वैयक्तिक सहभाग पुढीलप्रमाणे**

| अ.क्र | नांव | क्रीडाबाब | निकाल |
|---|---|---|---|
| 1 | ज्योतीराम कौलगे बीपीएड् (द्वितीयवर्ष) | पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन (१० किमी.)<br>खडकी मॅरेथॉन (१० किमी.)<br>गणेगाव मॅरेथॉन (१० किमी.)<br>खराडी मॅरेथॉन (१० किमी.)<br>जेजुरी मॅरेथॉन (१० किमी.)<br>जे.एस.पी.एम.मॅरेथॉन (१० किमी.) | सहभाग (३४ वा क्र.)<br>द्वितीय<br>तृतीय<br>प्रथम<br>प्रथम<br>प्रथम |
| 2 | कृष्णा काळे बीपीएड् (II yr) | मल्लखांब महापौर चषक<br>३४ वी राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धा सातारा | ३ सुवर्ण, १ रौप्य<br>१ सुवर्ण |
| 3 | साहिल बागवान एमपीएड् (I yr) | अ.भा.आंतर विद्यापीठ सा.फु.पुणे विद्यापीठ बेसबॉल संघ (मार्गदर्शक) | रौप्य पदक |
| 4 | अनिता कदम बीपीएड् (II yr)<br>गौरी गोंडिल बीपीएड् (I yr)<br>अश्विनी काळे बीपीएड् (II yr) | सिनियर राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धा सहभाग व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड | सुवर्ण पदक<br>सुवर्ण पदक<br>कांस्य पदक |
| 5 | सचिन निकम बीपीएड् (II yr)<br>अमोल साळवे बीपीएड् (II yr)<br>सुमित राक्षे बीपीएड् (II yr) | डेव्हिल सर्किट ऑप्स्टिरेस –दिल्ली | सहभाग |

- **पंच कार्य**

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांखेरीज आमचे खेळाडू विद्यार्थी अनेक राष्ट्रीय/ राज्यस्तरीय /जिल्हास्तरीय खुल्या क्रीडास्पर्धांमध्ये सहभागी होऊन पंचकार्य करतात. प्रा. शिरिष मोरे पंचकार्य विभाग सांभाळतात. रोख पारितोषिके मिळवितात व स्वकष्टार्जित कमाई करून शिक्षणाचे शुल्क भरतात.यंदा आधार मूक बधीर विद्यालय, बिबवेवाडी, पुणे येथील शाळेत आंतरशालेय क्रीडास्पर्धांसाठी डॉ योगेश बोडके व एमपीएडचे १० विद्यार्थी यांनी पंचकार्य केले.

## ➢ आयोजन

- **आंतरमहविद्यालयीन स्पर्धा**

महाविद्यालय, स्पर्धा सहभागाबरोबरच विविध पातळींवरील स्पर्धांचे आयोजन करते. ह्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्पर्धा आयोजनाचाही अनुभव मिळतो.यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतर. विभागीय बास्केटबॉल (पुरुष), फुटबॉल (महिला) व आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल (महिला) आणि आंतरमहविद्यालयीन मल्लखांब, रोप मल्लखांब व जिम्नॅस्टिक्स (मुले व मुली) स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाने केले.

- **Sports and Fitness Carnival**

सालाबादप्रमाणे चंद्रशेखर आगाशे कॉलेज व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शारीरिक शिक्षण पदव्युत्तर विभाग यांच्या संघांमध्ये. 17 मार्च 2018 रोजी विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यांत आले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभागातील आणि आगाशे महाविद्यालयातील एमपीएडचे विद्यार्थी,यांमध्ये फुटबॉल,क्रॉसएक्स,बास्केटबॉल व गटचर्चा, या स्पर्धा आयोजित करण्यांत आल्या. **डॉ. शरद आहेर** यांनी प्राध्यापकांच्या सहकार्याने स्पर्धांचे संयोजन केले.

- **प्रजासत्ताक दिनाचे,** संस्थेच्या ०६ शाळा व वाणिज्य महाविद्यालयासह एकत्रितपणे भव्य स्वरूपात आयोजन करण्यांत आले.

- **आंतरकुल स्पर्धा**

  हा बीपीएड् अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणा–या भावी शिक्षकांसाठी अतिशय उपयुक्त कार्यक्रम. यामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धाचे आयोजन व व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यांत येते. दर शनिवारी आयोजित होणा–या आंतरकुल स्पर्धांमध्ये बीपीएड व एमपीएडचे चे विद्यार्थी सहभागी होतात.

- **ॲथलेटिक मीट**

  सालाबादप्रमाणे ३७ वी ॲथलेटिक मीट (मैदानी क्रीडामहोत्सव) बीपीएड व एमपीएडच्या विद्यार्थ्यांनी सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली व सेवकांच्या सहकार्याने दि.२६ ते २८ मार्च २०१८ या कालावधीत आयोजित करण्यांत येइल. या स्पर्धेत विजेत्या खेळाडूंना **सुवर्ण**,**रौप्य** व **कांस्य** पदके व प्रमाणपत्रके प्रदान करण्यांत येतील. खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून महाविद्यालयाच्या वतीने व कै. शैलेश जगताप यांच्या स्मरणार्थ २०१२–१३ च्या बॅचचे विद्यार्थी यांचेतर्फे पारितोषिके प्रदान करण्यांत येतात.

- **शा.शि. शिक्षक व मुख्याध्यापक यांची सभा**

  बी.पी.एड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याचा ७ आठवड्यांचा छात्रसेवा कार्यक्रम पुणे शहरातील ३० शाळांमध्ये राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कार्यानुभवाचा आढावा घेण्यासाठी या शाळांतील शा.शि.शिक्षक व मुख्याध्यापक यांची सभा २४ फेब्रुवारी २०१८ रोजी आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले.

- **राज्यस्तरीय कार्यशाळा**

सा.फु.पुणे विद्यापीठाच्या गुणवत्तासुधारकार्यक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये दि. १६ जानेवारी २०१८ रोजी Significance of stretches विषयक राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

प्रारंभी डॉ.पल्लवी कव्हाणे व डॉ. रूपेश थोपटे यांनी स्ट्रेचेसचे प्रात्यक्षिके, कार्यशाळेतील सहभागींकडून करवून घेतली व स्ट्रेचेसचे प्रकार व महत्त्व सांगितले.त्यानंतरच्या सत्रात डॉ. वैभव पाटील यांनी रिहॅबिलिटेशन ॲन्ड स्ट्रेचेस या विषयावर मार्गदर्शन केले . दुपारच्या अभ्याससत्रामध्ये डॉ. देविका भिडे यांनी रोल ऑफ स्ट्रेचेस या विषयावर व्याख्यान दिले.कार्यशाळेसाठी पुणे शहरातील महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, आजी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.डॉ. श्रीकांत महाडिक या कार्यशाळेचे समन्वयक होते.

- **राज्यस्तरीय चर्चासत्र**

सा.फु.पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत शै. वर्ष २०१७–१८ मध्ये महाविद्यालयामध्ये दि. २ व ३ फेब्रुबारी २०१८ या कालवधीमध्ये Science of Sports या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. कुणाल कुमार यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उदघाटन झाले.संस्थेचे सरकार्यवाह मा. श्री धनंजय दामले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. आर्मी स्पोर्टस सेंटरचे कमांडर डॉ. अरविंद झा यांनी याप्रसंगी आपल्या बीजभाषणाद्वारे क्रीडा व शारीरिक शिक्षण शास्त्र काळानुरूप कसे बदलले हे विशद करून सांगितले. या दोन दिवसीय चर्चासत्रामध्ये एकूण १० अभ्याससत्रे, २ परिसंवाद व १ मुलाखत संपन्न झाली. चर्चासत्रासाठी पुणे शहरातील महाविद्यालयातील प्राध्यापक, शारीरिक शिक्षण संचालक, आजी व माजी विद्यार्थी असे ५२ जण उपस्थित होते.चर्चासत्रामध्ये एकूण १७ शोधनिबंध सादर करण्यात आले. दोन्ही दिवशी सहभागींचा प्रतिसाद उत्तम होता. प्राचार्य, डॉ. सोपान कांगणे यांनी संचालक म्हणून तर डॉ. शरद आहेर यांनी चर्चासत्राचे

समन्वयक म्हणून चर्चासत्राचे काम पाहिले. चर्चासत्र यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थीवृंद यांचे उत्तम सहकार्य लाभले.

- **सेट वर्कशॉप**

पद्‌व्युत्तर विद्यार्थ्यांसाठी SET परीक्षा मार्गदर्शनासाठी दि. १२ ते १५ जानेवारी मार्च २०१८ या कालावधीत समन्वयक – डॉ शरद आहेर यांनी आपल्या सहका–यांच्या सहाय्याने यशस्वीरित्या कार्यशाळेचे आयोजन केले ३० विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

- **अडथळा शर्यत (**Obstyrace)

महाराष्ट्रीय मंडळाचे प्रमुख ध्येय म्हणजे समाजात खेळाचा, शारीरिक सुदृढतेचा आणि शारीरिक शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे.त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रीय मंडळ व चंद्रशेखर आगाशे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ ते १८ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या तिस–या आंतरशालेय अडथळा शर्यतींचे उदघाटन मा. खासदार श्री अनिल शिरोळे यांच्या उपस्थितीत,महाराष्ट्रीय मंडळाचे सरकार्यवाह श्री धनंजय दामले यांचे हस्ते झाले. पुणे जिल्हयातील ४२ मुलांच्या आणि २१ मुलींच्या अशा एकूण ६३ शालेय संघांनी या स्पर्धेत उस्फुर्त सहभाग घेतला यामध्ये १५७५ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

प्राथमिक फेरीमध्ये एकुण १० अडथळे विद्यार्थ्यांनी पार करावयाचे होते. ज्यामध्ये, सरपट्णे, तोल सांभाळणे, ढांगा टाकणे, उंचावरुन उडी मारणे, टायरमधुन जाणे, जड बॅगा वाहून नेणे या अडथळ्यांचा समावेश होता. अंतिमफेरीसाठी १२ अडथळे ठेवण्यात आले होते. पारितोषिक वितरण समारंभामध्ये, विजेत्या संघास रु.२५,०००/– उपविजेत्यास रु.२०,०००/– तर तृतीय संघास रु.१५,०००/– रु.ची पारितोषिके करंड्क व प्रत्येक खेळाडूस पदके देऊन गौरविण्यांत आले. तर सर्व वेगवान खेळाडूंमधून सर्वात वेगवान स्पर्धा पूर्ण करणा–या खेळाडूस प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास अनुक्रमे रु.२०००/– व रु.१०००/– ची रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. या उपक्रमाची शाळा, पालकवर्ग, शिक्षक व विद्यार्थी यांनी प्रशंसा केली.

- **प्रबोधनवर्ग/प्रशिक्षणवर्ग**

यंदा प्रथमच बॅडमिंटनचा क्रॅश कोर्स महाविद्यालयात आयोजित करण्यांत आला १४ विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणवर्गाचा लाभ घेतला. शटल्स मास्टर्सच्या प्रशिक्षक अंजली लोटके यांनी प्रशिक्षणार्थींना विशेष मार्गदर्शन केले.या वर्गाचे संयोजन डॉ उज्वला राजे यांनी केले. (कालावधी दि. ५ ते ९ मार्च २०१८ (१० घड्याळी तास)

- **विशेष निवासी शिबिर**

स्वस्थ भारत स्वच्छ भारत अभियानाअम्तर्गत सा.फु. पुणे विद्यापीठाच्या आर्थिक सहाय्याने वेल्हा तालुक्यातील गुंजवणी हे खेडे दत्तक घेण्यांत आले. दि.२६ जाने ते १ फेब्रु.२०१८ या कालावधीत आयोजित विशेष शिबिरामध्ये बीपीएड (द्वितीयवर्ष)च्या विद्यार्थ्यांनी गुंजवणी येथे रस्ते तयार करणे, प्रौढशिक्षण वर्ग, आपत्कालिन व्यवस्थापन इ. विविध विकास कामे केली. प्रा. कुमार उपाध्याय एन.एस.एस.योजनेचे समन्वयक आहेत. या शिबिरामध्ये सौ. नेत्रा उदगीर, प्रा. अक्षय भुजबळ, श्री मच्छिम्द्र माने, विजय थिटे व संदीप जाधव यांनी सहकार्य केले.

- **शिबिर, सहली**

डॉ. अमित प्रभू यांच्या नेतृत्त्वाखाली बीपीएड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची सहल सिंहगड येथे गेली. तर शिबिर स्नेहसेवा येथे नेण्यात आले.

- **टूर दे डॅम**

शै. वर्ष २०१७–१८ मध्ये एमपीएड प्रथम व द्वितीयवर्ष विद्यार्थ्याची टूर दे डॅम सायकल ट्रीप दि. १३ व १४ /१०/२०१७ या कालवधीत आयोजित करण्यात आली. सदर सायकल ट्रीपचा एकूण मार्ग १२४ कि.मी.चा होता, ज्यामध्ये पहिल्या दिवशी एकूण ९४ कि.मी. चा प्रवास करण्यात आला. दिवस अखेर सायंकाळी खानापूर येथील स्नेहसेवा येथे मुक्काम करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी जीवनमूल्यांवर आधारीत कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमाचे नियोजनास श्री अक्षय भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले.भोजनानंतर विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेस चालना देणारे विविध उपक्रम राबविण्यात आले.

दुस–या दिवशी सकाळी परतीच्या प्रवासासाठी २८ कि.मी.सायकल प्रवास करुन TOUR DE DAM (Cycle Trip) ची चंद्रशेखर आगाशे शा.शि.महाविद्यालयमध्ये सांगता झाली. या सहलीत ४० विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. सा.फु. पुणे विद्यापीठाच्या सहलीचे निकषांच्या पूर्ततेसह सदर सहल आयोजित करण्यात आली या सहलीमध्ये डॉ. आहेर, डॉ. प्रभू व प्रा.उपाध्याय यांनी सहभाग घेतला, डॉ. शरद आहेर सहल प्रमुख होते. सहलीस प्राचार्य डॉ. कांगणे यांनी शुभेच्छा दिल्या

- **आगाशे कबड्डी लीग २०१८** (AKL 2018)

महाविद्यालय क्रीडा व शारीरिक शिक्षण क्षेत्रात, नित्यनियमाने नवनवीन प्रयोग करण्यासाठी, व उपक्रम राबविण्यासाठी अग्रेसर असते. या वर्षी नवीन प्रयोग म्हणून दि. ४ व ५ एप्रिल २०१८ या कालावधीत कबड्डी लीगचे आयोजन करण्यांत आले. या कार्यक्रमाची परवानगी मिळाल्यावर लगेच प्रोजेक्ट लेखन करून सभा घेण्यांत आली. व सविस्तर चर्चा करून, स्पर्धा स्वरूप, नियम, अंमलबजावणी याची निश्चिती केली.व्यावसायिक स्पर्धांप्रमाणे संघनिर्मितीसाठी ऑक्शन करण्यांत आले. ऑक्शन/बिल्डिंग प्रक्रियेचे नियम काटेकोरपणे पाळून चर संघचालकांनी प्रत्येकी १४ खेळाडू निवडले. सर्व खेळाडू संघांशी करारबद्ध झाले व त्यांचे प्रशिक्षण घेण्यांत आले. ही स्पर्धा पदवी व पदव्युत्तर अशा सर्वासाठी होती. त्याचप्रमाणे नवीन खेळाडूंपासून नावाजलेल्या खेळाडूंपर्यंत अशा सर्वांचा समावेश केला गेला. यामध्ये माजी विद्यार्थ्यांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग असल्यामुळे स्पर्धा आयोजनाची पातळी अधिक उंचावली गेली. दि. ४ व ५ एप्रिल २०१८ रोजी AKL 2018 या स्पर्धा घेण्यांत आल्या.

सदर स्पर्धेत बीपीएड व एमपीएड चे विद्यार्थी विविध भूमिकेत होते. AKL 2018 मध्ये, आगाशे चॅलेंजर्स, आगाशे फायटर्स, आगाशे सोल्जर्स आणि आगाशे वॉरियर्स हे चार संघ सहभागी झाले या संघांचे Franchise owners म्हणून महाविद्यालयातील चार प्राध्यापक तर Franchise mentors म्हणून चार माजी विद्यार्थ्यांनी भूमिका पार पाडली. एमपीएड (द्रितीयवर्ष) च्या विद्यार्थ्यानी सपोर्ट स्टाफ म्हणजे,मानसोपचारतज्ञ, आहारतज्ञ, फिटनेस प्रशिक्षक व फिजिओथेरपिस्ट म्हणून काम पाहिले. तर बीपीएडचे ३० विद्यार्थी स्वयंसेवक होते. तसेच दामले प्रशालेचे हेगडकरसर व संघटनेचे श्री पियुष हनवंते यांच्या नेतृत्त्वाखाली १४ माजी विद्यार्थ्यांनी पंचकार्य केले. माजी विद्यार्थ्यांनी निवेदक व समालोचक म्हणून काम पाहिले. अंतिम सामन्यात आगाशे सोल्जर्स विरूध्द आगाशे वॉरियर्स हा संघ विजेता ठरला.स्पर्धेमध्ये विजेता, उपविजेता, सर्वात मूल्यवान खेळाडू, उदयोन्मुख खेळाडू, सर्वोत्कृष्ट चढाईपटू, सर्वोत्कृष्ट बचाव खेळाडू अशी बक्षीसे देण्यांत आली. या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यांत अनेक आजी, माजी विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी सहकार्य केले. मा. सरकार्यवाह श्री धनंजय दामले व मा. प्राचार्य कांगणे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले.

- **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण योजना** राष्ट्रीय सेवा योजना – (एनएसएस)(वर्षभरातील उपक्रम) शै. वर्ष २०१७–१८ मध्ये प्रथमच महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना राबविण्यास प्रारंभ झाला. दि.२९ ऑगस्ट २०१७ रोजी क्रीडादिनाचे निमित्त बीपीएड (द्वितीयवर्ष)च्या विद्यार्थ्यांनी सायकलरॅली आयोजित करून क्रीडेद्वारे सुदृढता व निरामयतेचा संदेश जनसामान्यांपर्यत पोहोचविण्यात आला. दि.२३ सप्टेंबर २०१७ रोजी पर्वती स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी येथे परिसर स्वच्छता करून पथनाट्याद्वरे स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच स्वारगेट बसस्थानकाची स्वच्छता करण्यात आली.

एनएसएस अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात जुलै २०१७ मध्ये वृक्षारोपण व गांधीजयंतीच्या दिवशी परिसर स्वच्छता ही कामे विद्यार्थ्यांनी केली. प्रदूषणमुक्त गणेशोत्सव या संकल्पनेअंतर्गत शाडूपासून गणपती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

दि.३ डिसेंबर २०१७ रोजी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये स्वयंसेवक, पंचकार्य अशी कामे विद्यार्थ्यानी केली.

दि.१८ जानेवारी २०१८ रोजी वित्तीय साक्षरता या विषयावर श्री माधव मुतालिक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

- **कमवा व शिका योजना**

  सा.फु.पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या विविध योजनातर्गत कमवा व शिका, सेट मार्गदर्शन कार्यशाळा व साहसी उपक्रम या योजना महाविद्यालयाने राबविल्या. कमवा व शिका योजनेमध्ये निवडसमितीद्वारा बी.पी.एड्. प्रथम व द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या एकूण २३ विद्यार्थ्यांची आर्थिक गरजेनुसार निवड करण्यांत आली. वैयक्तिक माहिती घेऊन गरजू विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी करून घेतले. १२ विद्यार्थी व ११ विद्यार्थिनी असे एकूण २३ विद्यार्थी या योजनेत सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल शालेय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका,व सायंकालीन क्रीडावर्ग राबविणे, ग्रंथालय,संगणककक्ष,साहित्यखोली, क्रीडांगण इत्यादींची देखभाल, वृक्षसंवर्धन अशी उत्साहाने कामे केली. डॉ बी एस. पोटे या योजनेचे समन्वयक आहेत.

- **अंतर्गत तक्रार निवारण समिती**

  महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती अस्तित्त्वात असून ही समिती विद्यार्थ्यांच्या तक्रारींची वेळीच दखल घेऊन तक्रारींचे निवारण करण्याचे कार्य करते.

- **राष्ट्रीय चर्चासत्रे कार्यशाळा सहभाग**

**प्राचार्य डॉ.सोपान कांगणे व डॉ. श्रध्दा नाईक** –Resource persons : State Level Seminar on “Health and Nutritional Status of Women” (6-7 Feb.2018) at Women’s college of Home Science & BCA,Loni , Ahemednagar (Title of paper of Dr. Kangane – Effect of Yoga Practices on Physiological Parameters of School going Girls.)

**डॉ. अमित प्रभू** एमपीएड (द्वितीयवर्ष) चे ७ विद्यार्थी दि.३ ते १२ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत डॉ. अमित प्रभू यांच्यासह लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल एज्युकेशन,ग्वाल्हेर येथे आयोजित Nurtition & Exercise for Weight Management या राष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी झाले.

**डॉ. बालाजी पोटे** – शारीरिक शिक्षण विभाग, सा.फु. पुणे विद्यापीठ आयोजित नॅशनल कॉन्फरन्समध्ये चेअरपर्सन म्हणून सहभाग (१५–१७ फेब्रु.२०१८)

**डॉ. बालाजी पोटे व डॉ. महेश देशपांडे** – बालकल्याण केंद्र या अपंगासाठी कार्य करणा–या संस्थेत ॲथलेटिक्स विषयावर व्याख्याने (दि.१५ मार्च २०१८)

**डॉ. महेश देशपांडे व डॉ. योगेश बोडके** – के बी.हिरे महाविद्यालय नाशिक येथे आयोजित नॅशनल सेमिनार मध्ये Resource person म्हणून सहभाग

**डॉ. योगेश बोडके** –दि. २ व ३ मार्च २०१८ या कालवधीत गोवा हॅन्डबॉल असोसिएशन येथे आयोजित रेफरी क्लिनिक मध्ये Resource person म्हणून सहभाग

**श्री माधव मुतालिक यांनी** उच्च शिक्षण विभागाच्या श्री राजर्षी शाहू शिष्यवृत्ती योजना उपसमितीचे सदस्य म्हणून काम केले.

**श्री माधव मुतालिक व श्री राजीव तिकोने** यांनी सा.फु.पुणे विद्यापीठ वित्त विभागाने आयोजित केलेल्या परीक्षा हिशेब सादरीकरणाबाबतच्या कार्यशाळेत सहभाग धेतला

➢ **प्राध्यापकांची विशेष कामगिरी**

- डॉ. कांगणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व भारती विद्यापीठाच्या आर. आर. कमिटीचे आणि गोवा विद्यापीठ – शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळाचे सदस्य.२०१७–१८ साठी उच्चशिक्षण विभागाअंतर्गत बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाचे केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती सदस्य.
- डॉ. बालाजी पोटे – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याणयोजनेचे समन्वयक आणि महाविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक म्हणून काम पहातात

- डॉ. शरद आहेर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये बीओएस शारीरिकशिक्षण– टिचर एज्युकेशन अभ्यासमंडळाचे अध्यक्ष. पद्व्युत्तर विभागाचे प्रमुख म्हणून काम पहातात.
- डॉ. आहेर व डॉ. बोडके – दि. १६ ते १८ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत पुणे विभागातील सुमारे ६३ शाळांतील १५७५ विद्यार्थ्यासाठी अडथळ्यांच्या शर्यतीचे यशस्वी आयोजन केले.
- डॉ. उज्वला राजे शालेय पाठ विभागाचे व महाविद्यालयाच्या Extension wing coordinator आणि प्लेसमेंट सेलचे काम पहातात. महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार समिती अध्यक्ष आहेत.
- डॉ. श्रद्धा नाईक – महाविद्यालयाच्या Internal Quality Assurance Cell Coordinator म्हणून काम पहातात. आगाशे कबड्डी लीग ची संकल्पना यशस्वीरित्या राबविली.
- डॉ. श्रीकांत महाडिक – विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे आणि स्पोर्टस साहित्य विभाग सांभाळतात.
- डॉ. एम.एन. देशपांडे संशोधन विभागाचे समन्वयक म्हणून काम पहातात.
- प्रा. शिरिष मोरे आंतरमहाविद्यालय व आंतर विभागीय स्पर्धाविभाग व पंचकार्य विभाग सांभाळतात.
- प्रा. कुमार उपाध्याय यांची भुवनेश्वर ते पुणे – सायकल सफारी दि.२३ डिसेंबर ते ३ जानेवारी.२०१८ या कालवधीत यशस्वीपणे पार पाडली. सायकल सफारीच्या माध्यमातून त्यांनी प्रदूषणमुक्त भारत ही संकल्पना जनमानसापर्यत पोहोचविली.
- आमचे प्राध्यापक नेहमीच नित्य कार्याव्यितिरिक्त संशोधन करुन क्रीडाक्षेत्रात भर घालत असतात. प्राचार्य व प्राध्यापक विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे परिषदा इ.मध्ये संशोधन निबंध, बीजभाषणे याद्वारा सहभाग घेतात. समाजात व्यायाम व तंदुरुस्ती विषयक व्याख्याने देऊन समाज प्रबोधन करतात.
- आज मितीस महाविद्यालयात प्राचार्यांसह आठ प्राध्यापक पीएच.डी.प्राप्त आहेत.२ प्राध्यापकांचे काम पूर्णत्त्वाचे मार्गावर आहे. १२ प्राध्यापकांना पीअेच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता प्राप्त आहे. या वर्षावधीत डॉ. पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ विद्यार्थ्यांनी एम फिल व डॉ. ठोके यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ विद्यार्थ्यांनी पीअेच.डी. पदवी प्राप्त केली.

- **अर्थसहाय्य**

शै. वर्ष २०१७–१८ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमा अंतर्गत राज्यस्तरीय कार्यशाळा व चर्चासत्र आयोजनासाठी अनुक्रमे रू.६००००/– रु. १,००,०००/– मंजूर झाले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनांसाठी रू.५१,०००/– व विद्यार्थी कल्याण योजनांसाठी रू.२१,०००/– चे अनुदान मंजूर झाले.

- **पारितोषिके**

महाराष्ट्रीय मंडळातर्फे ध्यानचंद डे–क्रीडादिनाचे औचित्य साधून खालील खेळाडूंना क्रीडाप्राविण्यासाठी सन्मानित करण्यात आले. तसेच राज्य, राष्ट्रीय/खुल्या स्पर्धेत चमकलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. डॉ. महेश देशपांडे – यांना मंडळाचा आदर्श शिक्षक पुरस्कार तर श्री राजीव तिकोने यांना कै.सुशांत गोडबोले स्मरणार्थ उत्कृष्ट प्रशासकीय सेवक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | क्रीडा प्रकार | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती मानसी पाटणकर | खो खो | एमपीएड् (द्वितीय वर्ष) |
| २ | श्री. कृष्णा काळे | मल्लखांब | बीपीएड् (द्वितीय वर्ष) |
| ३ | श्रीमती स्नेहल काळे | बेसबॉल | बीपीएड् (द्वितीय वर्ष) |
| ४ | श्रीमती प्रियांका सूर्यवंशी | ज्युदो | बीपीएड् (द्वितीय वर्ष) |
| ५ | श्रीमती अनिता निकम | ज्युदो | बीपीएड् (द्वितीय वर्ष) |
| ६ | श्रीमती आशालता फरांदे | फुटबॉल | बीपीएड् (द्वितीय वर्ष) |
| ७ | श्रीमती एल्सी फर्नान्डिस | फुटबॉल | एमपीएड् (द्वितीय वर्ष) |
| ८ | श्रीमती वैशाली मोजाड | नेटबॉल | बीपीएड् (द्वितीय वर्ष) |

- शै वर्ष २०१७–१८ चे प्राईड ऑफ आगाशे पारितोषिक, गरवारे वाणिज्य महाविद्यालयाचे माजी संचालक, शारीरिक शिक्षण, प्रा.शैलेश आपटे यांना प्रदान करण्यांत आले.

- **कँपस प्लेसमेंट**

विद्यार्थ्यांना नोक–या मिळण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल द्वारे कँपस इंटरव्हयू आयोजित केले जातात. विविध नामांकित शाळा,जिम, व कंपन्यामध्ये आमच्या बीपीएड्. व एम.पी.एड् च्या विद्यार्थ्यांना नोक–या मिळतात. वर्षभरात विद्यार्थ्यांना नोकरी संदर्भात सहकार्य करण्यात येते.डॉ. उज्वला राजे प्लेसमेंट विभागाच्या समन्वयक आहेत.

- **मान्यवरांच्या भेटी**

  मा.खासदार श्री. अनिल शिरोळे, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. कुणाल कुमार, कमांडर ,आर्मी स्पोर्टस सेंटर,डॉ.अरविंद झा, डॉ.वैभव पाटील, डॉ.रूपेश थोपटे, डॉ.देविका भिडे, डॉ.रघुनाथ मिसाळ – प्राचार्य, अरिहंत महाविद्यालय

- **परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प**

  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने एम.पी.एड्.ची परीक्षा. बी.पी.एड् व एम.पी.एड्. अभ्यासक्रमाच्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे कार्य डायरेक्टर डॉ. सोपान कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्वांच्या सहकार्याने पूर्ण झाले.

- **ग्रंथालय**

  या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयामध्ये रू.४२४३१/- ची ग्रंथखरेदी करण्यात आली.ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी 08 संगणक व वाय फाय सुविधा उपलब्ध आहे. या वर्षाअखेर ग्रंथालयामध्ये एकूण पुस्तके ३५०००, शीर्षके २४९२५,क्रमिक पुस्तके ५२२९, संदर्भ ग्रंथ ४७०८ ,विश्वकोश ७५, सीडी रॉम्स ९८ व व्ही.सी.डी १०० इ. उपलब्ध आहेत. १२ ऑक्टोबर २०१७ रोजी Date with Library या उपक्रमा अंतर्गत प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांना ग्रंथालयात विविध पुस्तके मुक्तपणे हाताळण्याची व्यवस्था करण्यात आली. बीपीएड प्रथमवर्षच्या विद्यार्थ्यांना मेथडची इ.५ ते ९ वी ची क्रमिक पुस्तके तसेच १ ली ते ५ वी शा.शि.शिक्षक हस्तपुस्तिका कोर्स मटेरियलमध्ये देण्यात आली. बीपीएड द्वितीय वर्षच्या विद्यार्थ्यांना मेथडची इ.५ ते ९ वी ची क्रमिक पुस्तके तसेच १ ली ते ५ वी व इ.९ वी व १० वी शा.शि.शिक्षक हस्तपुस्तिका व क्रीडस्पर्धा सामने व पूर्वतयारी(प्रा. भा.स.गोडबोले), शा.शि. मापन व मूल्यमापन (डॉ. शरद आहेर) व्यायामाशी मैत्री आरोग्याची खात्री (ऋजूता दिवेकर) ही पुस्तके कोर्स मटेरियल अंतर्गत देण्यात आली.

- **सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्याने**

वर्षभरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच प्रेरणादिन,मेजर ध्यानचंददिन (क्रीडादिन) देशभक्तिपर गीते, Date with Library, मराठीगौरव दिन,हिंदी दिन, महिला दिन, संविधान दिन, राष्ट्रीय सण, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांशी दूरदर्शनवरील सुसंवाद, आणि बीपीएड पदवीग्रहण समारंभ या कार्यक्रमांचा समावेश होता.

वर्षभरात विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली. ती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | व्याख्यात्याचे नाव | विषय |
|---|---|---|
| १ | डॉ. विश्वास वाळवेकर | Sports Conditioning course-<br>New Horizon Calling |
| २ | श्री निर्मल साळवी | मे. ध्यानचम्द दिन (क्रीडादिन)– व्याख्यान |
| ३ | श्री निहाल शेख | प्रदूषणमुक्त गणेशोत्सव – कार्यशाळा |
| ४ | प्रा. विश्वास गाडे | सदभावना आणि युवक |
| ५ | प्रा. राजेंद्र कुंभार | संशोधन – संदर्भ साहित्याचा आढावा |
| ६ | डॉ. वर्षा तोडमल | शैक्षणिक क्रांतीचा शांतिदूत |
| ७ | डॉ. पाटील<br>(दीनानाथ मंगेशकर) | एक्सरसाईज व रिहॅबिलिटेशन |
| ८ | डॉ. आलेगावकर | भावनिक बुध्दिमत्ता मापन |
| ९ | प्रा अयाचित<br>(एससीईआरटी) | इंग्रजी माध्यम असावे की नसावे |

## ➢ निवृत्ती व नियुक्ती

- महाविद्यालयातील सहाय्यक अधिव्याख्याता प्रा.ब्युला सॅबेस्टियन यांनी दि. २९ सप्टेंबर २०१७ रोजी राजीनामा दिला.
- मुख्यलिपिक, सौ.नेत्रा उदगीर नियत वयोमानानुसार, दि.३१ ऑक्टोबर २०१७ रोजी सेवानिवृत्त झाल्या.दि.१ नोव्हेंबर २०१७ पासून श्री माधव मुतालिक यांना सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात आली.

**शैक्षणिक वर्ष २०१७–१८ साठी बी.पी.एड्.व एम. पी.एड्. पदवीचे नियुक्त विद्यार्थी मंडळ**

| Sr. No. | Designation | Name |
|---|---|---|
| 1 | Principal – Chairman | Dr. S.E.Kangane |
| 2 | Lecturer nominated by Principal | Dr.Y.H.Bodke |
| 3 | Teacher in charge of National Cadet Crops | Dr. U.L.Raje |
| 4 | National Service Scheme Prog. Officer | Prof.K.K.Upadhyay |
| 5 | Director of Sports & Phy.Edn. | Mr. S.V. More |
| 6 | Highest Academic Merit preceding year for B.P.Ed.(I$^{st}$ yr) | A.Div. Mr.Kshitij Sonawane<br>B.Div. Ms.Pooja Timke |
| 7 | Highest Academic Merit preceding year for B.P.Ed.(IInd yr) | A.Div. Mr.Siddheshwar Kendre<br>B.Div. Mr.Samtosh Khatpe |
| 8 | Highest Academic Merit preceding year for M.P.Ed.I$^{st}$ Year | Ms. Nakita Phernandes |
| 9 | Highest Academic Merit preceding year for M.Ed.(Phy.Edu) II$^{nd}$ Year | Ms. Rovita fernandes |
| 10 | Nominated by Principal<br>Outstanding Sport Performance (U.R.) | Mr. Jorawar Ganesh<br>(BPEd.II Yr) |
| 11 | Student member - N.S.S. Scheme | Mr. Babaji Salunkhe<br>Mr.Akshay Kamble<br>Ms.Bindu Thakur |
| 12 | Student member - N.C.C. Scheme | Mr. Saurabh Gunjal |
| 13 | Student member - Cultural Activity | Mr.Sumit Nikam |
| 14 | Lady student representative | BPEd (I yr) Ms.Preeti Hans |
| 15 | Lady student representative | B.P.Ed. (II Yr) Ms.Ashwini Kale |
| 16 | Intra Mural Incharge | BPEd (I yr) Mr.Akshay yadav<br>BPEd (II yr) Mr.Sachin Nikam<br>MPEd. –Mr.Mahesh Pawar |
| 17 | Extra Mural Incharge | BPEd (I yr) Mr.Suraj Gaikwad<br>MPEd (II yr) Mr.Sahil Bagwan |
| 18 | General Secretary | Mr.Gaurav Ghorpade |

महाराष्ट्रीय मंडळाचे सरचिटणीस, मा.श्री धनंजय दामले यांचे प्रोत्साहन आणि आमचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख नेहमीच उंचावत आहे.

**(डॉ. सोपान एकनाथ कांगणे)**
24/03/2018